आजी आणि विशाल भोपळा

एक बंगाली लोककथा



कोण्या एके काळी, भारतातील एका छोट्याशा गावात एक वृद्ध स्त्री राहात होती. सगळेजण तिला आजी म्हणत असत. तिला बागकाम करायला आवडत असे. तिची भाजीची बाग गावात सर्वोत्कृष्ट होती. एके दिवशी आजीला तिच्या मुलीचे पत्र आले. ही मुलगी जंगलाच्या दुसऱ्या टोकाला राहात होती.

पत्रात लिहिले होते, “आई, बऱ्याच दिवसांत तुला पाहिलं नाही. तुझी आठवण येतेय. मला भेटायला ये.”

मग आजी जंगलाच्या दुसऱ्या टोकाला जायला निघाली. हा प्रवास खूप धोक्याचा होता. वाटेत तिला तीन भुकेली श्वापदे भेटली: लबाड कोल्हा, भीतिदायक अस्वल आणि तगडा पट्ट्यापट्ट्यांचा वाघ. आजी आपली हुशारी वापरून या जनावरांपासून स्वत:चा बचाव करून जंगल पार करेल? ती घरी सुखरूप पोहोचेल?

ही कथा धाडस, चातुर्य आणि प्रेमाची कहाणी आहे. मुलांना ती नक्की आवडेल.



आजी आणि विशाल भोपळा

पुन:कथन: चित्रा बॅनर्जी दिवाकरुनी

चित्रे: सुसी वॉटर्स

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन



कोण्या एके काळी, भारतातील एका छोट्याशा गावात एक वृद्ध स्त्री राहात होती. सगळेजण तिला आजी म्हणत असत. तिला बागकाम करायला आवडत असे. तिची भाजीची बाग गावात सर्वोत्कृष्ट होती.

आजी आपल्या लहानशा झोपडीत एकटीच राहात असे. तिची झोपडी गावाच्या सीमेवर असलेल्या एका घनदाट जंगलानजिक होती. कधीकधी जंगलात हत्ती चालत जाऊ लागले की त्याचा *थप-थप-थप* असा आवाज तिला ऐकू येई. कधी सुकलेल्या पालापाचोळ्यांतून सरपटत जाणाऱ्या पाली-सरड्यांचा *खस-खस* असा आवाज तिला ऐकू येई.

पण आजीला त्याची पर्वा नव्हती. कारण तिचे रक्षण करायला तिच्याकडे, काळू आणि बाळू, हे दोन एकनिष्ठ कुत्रे होते. ते बागकामातही तिला छोटीमोठी मदत करत असत.



एके दिवशी आजीला तिच्या मुलीचे पत्र आले. ही मुलगी जंगलाच्या दुसऱ्या टोकाला राहात होती.

पत्रात लिहिले होते, “आई, बऱ्याच दिवसांत तुला पाहिलं नाही. तुझी आठवण येतेय. मला भेटायला ये.”.

आजीलाही आपल्या मुलीची खूप आठवण येत होती. तिने मुलीकडे जायचे ठरवले. पण तिला हिंस्त्र श्वापदे असलेल्या जंगलातून प्रवास करण्याचे भय वाटत होते. मग ती स्वत:शी म्हणाली, “आयुष्यात थोडंसंही साहस नसेल तर काय मजा?”



आपले सामान बांधून तिने लाडक्या कुत्र्यांचा निरोप घेतला. “काळजी करू नका, पोरांनो. मी लवकरच परतेन. आपल्या बागेची चांगली काळजी घ्या,” ती म्हणाली. “*भू-भू!* आम्ही नाही विसरणार. आम्ही जंगली जनावरांना पळवून लावू. तुला काही मदत लागली तर हाक दे, आम्ही नक्की येऊ,” काळू-बाळू म्हणाले.



आजी जंगलातून जाऊ लागली. *खट्-खट्-खट्*. लाल रंगाचा एक लबाड कोल्हा तिला वाटेत भेटला.

“अरे व्वा, आजी!” आपले टोकदार दात विचकत, ओठांवरून जीभ फिरवत तो म्हणाला. “किती छान! मी भुकेने कासावीस झालो आणि नेमक्या वेळी तू आलीस.”



आजीचे हृदय *धड-धड* करू लागले. पण आपण घाबरलो आहोत, हे तिने कोल्ह्याला जाणवू दिले नाही.

“तू नाश्त्यासाठी मला खायचा विचार करत असशील तर काही फायदा नाही,” ती म्हणाली. “मी किती काटकुळी आहे बघ! मी मुलीच्या घरून परतेन तेव्हा खूप जाडजूड झालेली असेन कारण ती स्वयंपाक उत्तम बनवते. त्यावेळी हवं तर खा मला.”

“चांगली कल्पना आहे!” असं म्हणत कोल्ह्याने आजीला वाट मोकळी करून दिली.



आजी जंगलाच्या आतपर्यंत पोहोचली,

खट्-खट्-खट्.

वाटेत तिला एक केसाळ काळे कुळकुळीत अस्वल भेटले.

"अरे व्वा आजी!" आपली नखे एका दगडावर रगडून धारदार करत तो म्हणाला. "किती छान! मी भुकेने कासावीस झालो आणि नेमक्या वेळी तू आलीस."

आजीचे ह्रदय *धड-धड* करू लागले. पण आपण घाबरलो आहोत, हे तिने अस्वलाला जाणवू दिले नाही.

"तू दुपारच्या जेवणासाठी मला खायचा विचार करत असशील तर काही फायदा नाही," ती म्हणाली. "मी किती काटकुळी आहे बघ! मी मुलीच्या घरून परतेन तेव्हा खूप जाडजूड झालेली असेन कारण ती स्वयंपाक उत्तम बनवते. त्यावेळी हवं तर खा मला."

"चांगली कल्पना आहे!" असं म्हणत अस्वलाने आजीला वाट मोकळी करून दिली.



आता आजी जंगलाच्या अगदी घनदाट भागात पोहोचली,

खट्-खट्-खट्.

अचानक वाटेत तिला एक तगडा, पट्ट्यापट्ट्यांचा वाघ भेटला.

"अरे व्वा आजी!" गुरगुरत, शेपटी हलवत तो म्हणाला. "किती छान! मी भुकेने कासावीस झालो आणि नेमक्या वेळी तू आलीस."

आजीचे हृदय *धक्-धक्* करू लागले. पण आपण घाबरलो आहोत, हे तिने वाघाला जाणवू दिले नाही.

"तू रात्रीच्या जेवणासाठी मला खायचा विचार करत असशील तर काही फायदा नाही," ती म्हणाली. "मी किती काटकुळी आहे बघ! मी मुलीच्या घरून परतेन तेव्हा खूप जाडजूड झालेली असेन कारण ती स्वयंपाक उत्तम बनवते. त्यावेळी हवं तर खा मला."

"चांगली कल्पना आहे!" असं म्हणत वाघाने आजीला वाट मोकळी करून दिली.

आजी मुलीच्या घरी पोहोचली. तिथे नातवंडांसोबत खेळत आणि शेजाऱ्यांशी जंगलातील साहसी प्रवासाच्या गप्पा करत तिचे दिवस फार आनंदात गेले.

तिथे मुलीच्या बागेत तिने खोदकाम, पाणी घालण्याचे काम आणि माशाच्या हाडांचे आपले खास खत घालण्याचे कामही केले. त्यामुळे बागेत मोठमोठ्या आकाराच्या भाज्या उगवल्या. चार गावातील लोक मुद्दाम त्या भाज्या बघण्यासाठी येऊ लागले आणि त्यांचे तोंड भरून कौतुक करू लागले. आजीने मुलीने बनवलेल्या रुचकर पदार्थांचा भरपूर आस्वाद घेतला आणि जंगलातील श्वापदांना सांगितल्याप्रमाणे ती चांगलीच जाडजूड झाली.





पण मग आजीला आपल्या लाडक्या कुत्र्यांची आठवण येऊ लागली. त्यांनी आपल्या बागेची काळजी घेतली असेल का? उंदरांनी आणि पक्ष्यांनी बागेची नासधूस तर केली नसेल? अशा नाना शंका तिच्या मनात येऊ लागल्या.

शेवटी ती मुलीला म्हणाली, “आता मला घरी परतायला पाहिजे. काळू-बाळू आणि माझी बागसुद्धा माझी वाट बघतायत. पण जंगलातले कोल्हा, अस्वल आणि वाघसुद्धा माझी वाट बघत असतील. यावेळी मी त्यांना काहीतरी सांगून फसवू शकत नाही.”

“काळजी करू नकोस,” मुलगी म्हणाली. “आपण थोडा विचार करू.”




दोघे बागेत जाऊन शांतपणे विचार करू लागले. तिथे त्यांना मोठमोठे भोपळे दिसले. मग त्यांना एक युक्ती सुचली.

मुलीने सर्वात मोठा भोपळा उचलला आणि त्याला आतून पोकळ केला. आजी त्याच्या आत जाऊन बसली. भोपळ्याची साल जाडजूड आणि गेंड्याच्या कातडीसारखी टणक होती. त्यामुळे आजी आतमध्ये आरामात बसू शकली. मुलीने आईला वाटेत खायला भात आणि चिंच दिले. मग भोपळ्याचा वरचा कापलेला भाग तिने बंद करून भाताने चिकटवून टाकला.

“आता कुणाला कळणार नाही की तू आतमध्ये आहेस,” मुलगी म्हणाली.



मग ती भोपळा घेऊन जंगलाच्या सीमेवर गेली आणि त्याला जोरात धक्का दिला. गरगर फिरत भोपळा जंगलातून पुढे पुढे जाऊ लागला.



थोड्याच वेळात भोपळा जंगलाच्या त्या भागात पोहोचला जिथे वाघ आजीची वाट बघत होता. वाघाने एवढा मोठा भोपळा कधी पाहिला नव्हता. हे काय आहे, त्याला कळेना.

"काय विचित्र प्राणी आहे हा!" तो ओरडला.

भोपळ्याच्या भोवताली फिरून वाघाने वास घेतला. भोपळा सर्व बाजूंनी बंद होता. त्यामुळे वाघाला आजीचा वास काही आला नाही.



भोपळ्यात बसलेली आजी पातळ, उंच आवाजात गाऊ लागली, "मी तर गरगरणारा भोपळा, गाणं गात राहातो. धक्का दे मला, मग दूर मी जातो."

"हो एवढं करू शकतो मी," वाघ म्हणाला. "ती म्हातारी केव्हा परतणार कळत नाही. मला खूप भूक लागलीय."

त्याने भोपळ्याला आपल्या डोक्याने जोरात धक्का दिला. भोपळा वर-खाली उसळत पुढे जाऊ लागला.

धडाम-धडाम, भोपळा उसळत निघाला..

"बाप रे बाप!" आजी उद्गारली. "थोडक्यात वाचले! हा भोपळा आतून मऊ आहे ते बरंय, नाहीतर माझ्या हाडांचा पार खुळखुळा झाला असता." मग तिने चिंचेसोबत थोडा भात खाल्ला.

काही वेळाने भोपळा जंगलाच्या त्या भागात पोहोचला जिथे अस्वल वाट बघत होते. त्यालाही हा भोपळा नेमकं काय आहे, हे कळले नाही.

"काय विचित्र जनावर आहे!" तो ओरडला. तो भोपळ्याभोवती वास घेत फिरला. पण भोपळा भाताने चिकटवून बंद केलेला असल्यामुळे अस्वलाला आजीचा वास आला नाही

आजी गाऊ लागली, "मी तर गरगरणारा भोपळा,
गाणं गात राहातो. धक्का दे मला,
मग दूर मी जातो."




"हो एवढं करू शकतो मी," अस्वल म्हणाले. "ती म्हातारी केव्हा परतणार कळत नाही. मला खूप भूक लागलीय."

त्याने भोपळ्याला आपल्या पंजाने जोरदार तडाखा दिला. भोपळा वेगाने गरगरत पुढे जाऊ लागला.

चट-पट, चट-पट, भोपळा गरगरू लागला.

"बाप रे बाप!" आजी म्हणाली. "थोडक्यात वाचले!"



"या भोपळ्याची साल जाडजूड आणि टणक आहे म्हणून बरं, नाहीतर माझं डोकं वेड्या पीरासारखं गरगरलं असतं." मग तिने चिंचेसोबत थोडा भात खाल्ला.

उसळत, उड्या मारत, गरगरत भोपळा पुढे जात राहिला आणि जंगलाच्या टोकानजिक पोहोचला.

“आता आणखी थोडासाच वेळ!” आजीच्या मनात आले.

भोपळा जंगलाच्या त्या भागात पोहोचला जिथे कोल्हा आजीची वाट बघत होता.

“हे काय आहे?” तो ओरडला आणि भोपळ्याभोवती फिरून वास घेऊ लागला.



आजी गाऊ लागली, “मी तर गरगरणारा भोपळा, गाणं गात राहातो. धक्का दे मला, मग दूर मी जातो.”



पण चतुर कोल्हा म्हणाला, “मी शंभरदा गावात गेलोय, कोंबड्या चोरायला. पण गाणारा भोपळा मी आजवर कधी पाहिला नाही. नक्कीच कुठेतरी पाणी मुरतंय.” त्याने आपल्या तीक्ष्ण दातांनी भोपळ्याला पकडले. तो त्याला पुढेमागे जोरजोरात हलवू लागला. त्यामुळे चिकटवलेल्या भागावरचा भात सुटला आणि उघडा पडला.

त्यातून आजी धापकन् बाहेर येऊन पडली.



“अस्सं, आजी!” कोल्हा दात काढून हसला.

“किती छान जाडजूड झालीयस! या भोपळ्यात काय करत होतीस?”

“शेवटी पकडलंस तू मला,” आजी म्हणाली. “आता मला तू खाऊन टाकणंच योग्य आहे. पण एक विनंती आहे माझी. तू मला खाण्याआधी मी शेवटचं एक गाणं गाऊ का?”

“बरं, बरं,” लाळ गाळत कोल्हा म्हणाला. “पण जास्त वेळ गाऊ नकोस.”

“जास्त नाही गाणार,” आजी म्हणाली. मग खूप मोठ्या आवाजात ती गाऊ लागली.

“काळू, बाळू, त-त-त!

काळू, बाळू इथे या पळत!

काळू, बाळू मला करा मदत!”



गावात काळू आणि बाळूने आजीचा आवाज ऐकला. ती संकटात आहे, याची त्यांना जाणीव झाली. ते वाऱ्यासारखे वेगाने जंगलाकडे धावू लागले. धावताना ते गुरगुरत दात भयानकपणे विचकत होते.

त्यांनी कोल्ह्याचा पाठलाग करून त्याला पळवून लावले. त्यांनी कोल्ह्याला एवढे घाबरवले की तो पुन्हा त्या भागात कधीच परतला नाही.



आजीने आपल्या लाडक्या कुत्र्यांना मायेने कुरवाळले.

“आभार, पोरांनो! तुम्ही माझा जीव वाचवलात,” ती म्हणाली.

“भू! भू!” काळू आणि बाळू विनम्रतेने म्हणाले. “फार काही नाही केलं आम्ही.”



घरी पोहोचल्यावर भाजीने भरगच्च फुललेली आपली बाग पाहून आजी हरखली. काळू आणि बाळूने त्यांचे काम चोख बजावले होते.

आजीने अगदी ताज्यातवान्या भाज्या निवडून तोडल्या आणि चविष्ट खिचडी बनवली. भात आणि डाळीसोबत त्यात तिने कोबी, मटार आणि पांढरे बटाटेही टाकले.

सगळ्यांनी एकत्र बसून खिचडी खाऊन टाकली.


समाप्त